# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

दिनांक 29/05/2021 (शनिवार)
(सकाळ)

---

### घरफोडी

पो. स्टे. पारशिवनी :— अंतर्गत 04 कि.मी अंतरावर पालोरा येथे दिनांक 28/05/2021 चे 02.00 वा. ते 04.00 वा. दरम्यान फिर्यादी नामे— अजरखॉ नसीबखॉ पठान, वय 25 वर्ष, रा. वार्ड क्र. 2 पालोरा याच्या घराच्या मागच्या दाराचा अज्ञात आरोपीने कोंडा तोडुन घरात प्रवेश केला. यानंतर आरोपीने कपाटात ठेवलेले सोन्याचे दागिने कि. 25,000/—रू. व नगदी 40,000/—रू. चा माल असा एकुण कि. 65,000/—रू. चा माल चोरून नेला. तसेच शेजारी राहणाऱ्या ग.भा. सुलोचना नामदेवराव क्षिरसागर यांचे घराचे सद्धा अज्ञात आरोपीने समोरच्या दाराचा लॉक तोडुन घरात प्रवेश करून लोखंडी कपाटात ठेवलेल सोन्या—चांदीचे दागिने किं. 7,250/—रू. असा एकुण कि. 72,250/—रू चा मुद्देमाल चोरून नेले.

सदर प्रकरणी फियादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. पारशिवनी येथे आरोपीविरुध्द कलम 457, 380 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक श्री संदिपान उबाळे मो क 7498179174 हे करीत आहे.

### चोरी

पो.स्टे. कन्हान :— अंतर्गत 2 कि.मी अंतरावर कांद्री कन्हान येथे दि. 25/05/2021 चे 22.00 वा. ते 22.30 वा. चे सुमारास फिर्यादी नामे— राजेश प्रभाकर हुड, वय 44 वर्ष, रा. रायनगर कन्हान हे रूद्रा ट्रान्सपोर्ट येथे मागील 15 वर्षा पासुन मेनेजर या पदावर कार्यरत आहेत. सदर ट्रान्सपोर्ट चे मालक नामे— अजय आकरे यांच्या कडील 31 ट्रक व इतर पिकअप वाहन यांचे देखरेख करण्याचे काम फिर्यादी हे करतात. त्यांचे सोबत अनिल बोटोलिया हा सदर ट्रान्सपोर्ट कंपनी मध्ये अकाउंट काम पाहतो. दि. 25/05/2021 राजी फिर्यादी हे ऑफिसच्या कामानिमीत्य बाहेर गेले असल्याने अनिल बोटोलिया याने आफिस चे काम आटपवुन 20.30 वा. सुमारास चाब्या ऑफिसच्या बाजुच्या रूममध्ये ठेवुन दिल्या होत्या. रात्री 22.30 वा. फिर्यादीला अजय कुशवाह याने फोनव्दारे माहिति दिली की, ''त्याची एमएच— 40/एके— 0122 क्रमांकाची बोलोरो पिकअप किमती 5,00,000/—रू. ची गाडी आरोपी नामे— आशिष पाल (याला नौकरी वरून काढलेला) याने गाडी आफिस समोरून चोरून फोरलाइनवर गाडी पलटी करून गाडीचे नुकसान केले. सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कन्हान येथे आरोपीविरुध्द कलम 379, 427 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरु असून गुन्हयाचा पुढील तपास नापोशी मंगेश ढबाले 9923621275 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर